(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट जी-९, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
Email : ciro@mahadiscom.in website : www.mahadiscom.in दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११
सी. आय. एन. नं. U४०१०९MH२००५SGC१५३६४५

जा.क्र. औसंवि/ब/नाट्य-क्रीडा/२०१८-१९/ No 20113 दिनांक : 18 AUG 2018

# परिपत्रक

**विषय :** महावितरण कंपनी अंतर्गत सन २०१८-१९ च्या वार्षिक क्रीडा व नाट्यस्पर्धा आयोजनाबाबत.

*********

मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक (महावितरण) यांनी संचालक (वित्त), संचालक (संचलन), संचालक (प्रकल्प) व कार्यकारी संचालक (मासं) यांचेशी विचार विनिमय करुन महावितरण कंपनी अंतर्गत सन २०१८-१९ च्या वार्षिक क्रीडा व नाट्यस्पर्धा आयोजनाची मंजूरी दिलेली असून त्यानुसार वार्षिक क्रीडा व नाट्यस्पर्धेचा कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील.

## -: वार्षिक नाट्यस्पर्धा :-

### १. प्रादेशिक स्तरावर आंतर परिमंडलीय नाटयस्पर्धा :

सदरच्या नाटयस्पर्धा प्रादेशिक कार्यालयाच्या वतीने **माहे सप्टेंबर -२०१८** मध्ये आयोजित कराव्यात. प्रादेशिक विभागातील सर्व संबंधित परिमंडळांनी परिमंडळ स्तरावर नाट्यसंघ तयार करुन निवड केलेल्या नाटकाची प्रवेशिका विहीत नमुन्यातील प्रपत्रात संबंधित प्रादेशिक कार्यालयाकडे दि. ३१/०८/२०१८ पर्यंत सादर करावी. नाटयस्पर्धेकरीता सांघिक कार्यालय, मुंबई हे परिमंडळ म्हणून कोकण प्रादेशिक कार्यालयाच्या नाटयस्पर्धेत सहभागी होईल. सदर नाट्यस्पर्धेचा कालावधी ०२ दिवसांचा राहील.

### २. राज्यस्तरीय आंतर प्रादेशिक विभाग नाटयस्पर्धा :

राज्यस्तरीय आंतर प्रादेशिक विभाग नाटयस्पर्धा औरंगाबाद परिमंडळाच्या यजमानपदाखाली **माहे ऑक्टोबर -२०१८** मध्ये आयोजित कराव्यात. तत्पूर्वी सर्व प्रादेशिक कार्यालयाने आपआपल्या आंतर परिमंडलीय नाटयस्पर्धा आयोजित करुन प्रथम क्रमांक प्राप्त नाटकाची प्रवेशिका विहीत नमुन्यातील प्रपत्रात संबंधित यजमान परिमंडळाकडे दि. २९/०९/२०१८ पर्यंत अथवा त्यापूर्वी पोहचेल अशी पाठवावी. सदर नाटयस्पर्धेचा कालावधी ०२ दिवसांचा राहील.

राज्यस्तरीय आंतर प्रादेशिक विभाग नाट्यस्पर्धा माहे ऑक्टोबर -२०१८ पर्यंत आयोजित कराव्यात, जेणेकरुन या स्पर्धेतून प्रथम क्रमांकाने विजयी ठरलेल्या नाटकास म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधी समितीच्या विद्यमाने आयोजित आंतर कंपनी नाट्यस्पर्धा तसेच परिमंडळ स्तरावरील नाट्यसंघास शासनाच्या महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे आयोजित केलेल्या औद्योगिक व व्यावसायिक कामगारांच्या नाट्यस्पर्धेत सहभागी होणे शक्य होईल.

### वार्षिक नाट्यस्पर्धा आयोजनासाठी आर्थिक तरतूद :

१. प्रादेशिक स्तरावरील आंतर परिमंडलीय / राज्यस्तरीय आंतर प्रादेशिक विभाग नाट्यस्पर्धेत सहभाग घेणाऱ्या नाट्यसंघास नाटकाचा सराव व सादरीकरणासाठी. - रु. ७५,०००/-

२. प्रादेशिक स्तरावरील आंतर परिमंडलीय / राज्यस्तरीय आंतर प्रादेशिक विभाग नाट्यस्पर्धेचे आयोजन करणाऱ्या परिमंडळास नाट्यगृहाच्या भाडेपोटी प्रति सत्र अनुदान रक्कम. - रु. १५,०००/-

३. प्रादेशिक स्तरावरील आंतर परिमंडलीय / राज्यस्तरीय आंतर प्रादेशिक विभाग नाट्यस्पर्धेचे आयोजन करण्यासाठी नाटक सादरीकरण परवाना शुल्क, परिक्षकांचे मानधन, कलावंताचे स्नेह संमेलन इ. - रु. २,००,०००/-

४. राज्यस्तरीय आंतर प्रादेशिक विभाग नाट्यस्पर्धेत सहभागी होवून प्रथम क्रमांक संपादन केलेल्या नाटकांस म.रा.वि.मं. कर्मचारी कल्याण निधी समितीच्या विद्यमाने आयोजित आंतर कंपनी नाट्यस्पर्धेत महावितरण कंपनीच्या वतीने सहभागी होण्यासाठी नाटकाचा सराव व सादरीकरणासाठी. - रु. ६०,०००/-

५. शासनाच्या महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे आयोजित केलेल्या औद्योगिक व व्यावसायिक कामगारांच्या नाट्यस्पर्धेत सहभागी होणाऱ्या परिमंडळ स्तरावरील नाट्यसंघास नाटकाचा सराव व सादरीकरणासाठी. - रु. ६०,०००/-

उपरोक्त तरतूद **आर्थिक वर्ष २०२०-२१** पर्यंत लागु राहील.

## -: वार्षिक क्रीडास्पर्धा :-

### १. परिमंडल स्तरावर निवड चाचणी :

राज्यस्तरीय आंतर परिमंडलीय क्रीडास्पर्धेकरिता परिमंडळ स्तरावर **माहे नोव्हेंबर -२०१८** मध्ये निवड चाचण्या आयोजित कराव्यात. भौगोलिक परिक्षेत्रानुसार निश्चित करण्यात आलेले परिमंडलांतर्गत प्रत्येक मंडलाने खालील नमूद केलेल्या निकषांनुसार खेळ / क्रीडा प्रकारनिहाय आंतरगृह स्पर्धेसाठी ०३ ते ०४ तसेच बाह्यगृह स्पर्धेसाठी ०५ ते ०६ खेळाडूंची निवड करुन अशा खेळाडू कर्मचाऱ्यांच्या नावांची यादी सोबत जोडलेल्या 'परिशिष्ट - अ' मधील आवेदनपत्रासह दि. ३१/१०/२०१८ पर्यंत संबंधित परिमंडळाकडे सादर करावी. निवड चाचणीचा कार्यक्रम ०१ दिवसाचा राहील तसेच, सदर निवड चाचण्या सुट्टीच्या दिवशी आयोजित कराव्यात.

**मंडल स्तरावर खेळाडूंची निवड करण्याचे निकष खालीलप्रमाणे राहील.**

- कर्मचारी खेळाडूंचे सध्याचे वय, वजन, शारीरिक पात्रता, खेळाचे कौशल्य इत्यादीचा विचार करुन संबंधित खेळ / क्रीडा प्रकारात निवड करावी.
- सन २०१७-१८ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या वार्षिक आंतर परिमंडलीय / आखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाच्या संबंधित खेळ / क्रीडा प्रकारांच्या क्रीडास्पर्धेत सहभाग / प्राविण्य संपादन करणाऱ्या खेळाडूंना प्राधान्य देण्यात यावे.
- नवीन भरती झालेले कर्मचारी ज्यांनी संबंधित खेळ / क्रीडा प्रकारांमध्ये शालेय / जिल्हा / राज्य / राष्ट्रीय पातळीवरील क्रीडास्पर्धेत सहभाग / प्राविण्य संपादन केले असल्यास त्यांचा प्राधान्याने विचार करण्यात यावा.

### २. राज्यस्तरीय आंतर परिमंडलीय क्रीडास्पर्धा :

राज्यस्तरीय आंतर परिमंडलीय क्रीडास्पर्धा पूणे परिमंडळाच्या यजमानपदाखाली **माहे डिसेंबर -२०१८** मध्ये आयोजित कराव्यात. तत्पुर्वी सर्व संबंधित परिमंडळांनी परिमंडळ स्तरावर

निवड चाचणी आयोजित करुन निवड केलेल्या खेळाडूंची यादी संबंधित यजमान परिमंडळाकडे दि. ३०/११/२०१८ पर्यंत पोहचेल अशी पाठवावी. सदर स्पर्धेचा कालावधी ०४ दिवसांचा राहील.

महावितरण कंपनीच्या वार्षिक क्रीडा स्पर्धेचे आयोजन सुटसुटीतपणे व सुनियंत्रीत होण्याच्या दृष्टीने भौगोलिक परिक्षेत्रानुसार खालीलप्रमाणे एकूण ०८ परिमंडळे निश्चित करण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | परिमंडळाचे नांव |
|---|---|
| १ | औरंगाबाद परिमंडळ (जळगांव परिमंडळासह) |
| २ | लातूर परिमंडळ (नांदेड परिमंडळासह) |
| ३ | कल्याण परिमंडळ (नाशिक परिमंडळासह) |
| ४ | सांघिक कार्यालय (भांडूप व रत्नागिरी परिमंडळासह) |
| ५ | नागपूर परिमंडळ (चंद्रपूर व गोंदिया परिमंडळासह) |
| ६ | अकोला परिमंडळ (अमरावती परिमंडळासह) |
| ७ | पुणे परिमंडळ (बारामती परिमंडळासह) |
| ८ | कोल्हापूर परिमंडळ |

तसेच, राज्यस्तरीय आंतर परिमंडलीय क्रीडास्पर्धेत खालील क्रीडा प्रकारांचा समावेश राहील.

| अ.क्र | खेळ / क्रीडा प्रकार | पुरुष खेळांडूची संख्या | महिला खेळांडूची संख्या | एकूण खेळाडूंची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | कबड्डी | १० | - | १० |
| २ | व्हॉलीबॉल | १० | - | १० |
| ३ | क्रिकेट | १३ | - | १३ |
| ४ | बॅडमिंटन (एकेरी / दुहेरी / सांघिक) | ५ | ३ | ८ |
| ५ | टेबल टेनिस (एकेरी / दुहेरी / सांघिक) | ५ | ३ | ८ |
| ६ | बुध्दीबळ | १ | १ | २ |
| ७ | कॅरम (एकेरी / दुहेरी) | ३ | ३ | ६ |
| ८ | टेनिकॉईट (एकेरी / दुहेरी) | - | ३ | ३ |
| ९ | ब्रीज | ६ | - | ६ |
| १० | कुस्ती (वजनगट) ५७, ६१, ६५, ७०, ७४, ७९, ८६, ९२, ९७, १२५ किलो | १० | - | १० |
| ११ | १०० मीटर धावणे | १ | १ | २ |
| १२ | २०० मीटर धावणे | १ | १ | २ |
| १३ | ४०० मीटर धावणे | १ | १ | २ |
| १४ | ८०० मीटर धावणे | १ | १ | २ |
| १५ | १५०० मीटर धावणे | १ | - | १ |
| १६ | ५००० मीटर धावणे | १ | - | १ |
| १७ | ४ X १०० मी. रिले (पुरुष व महिला) | रिलेकरीता स्पर्धेच्या वेळी उपलब्ध असलेल्या धावकांमधून संघ तयार करावा. | | |
| १८ | उंच उडी | १ | १ | २ |
| १९ | लांब उडी | १ | १ | २ |
| २० | गोळा फेक | १ | १ | २ |
| २१ | थाळी फेक | १ | १ | २ |
| २२ | भाला फेक | १ | १ | २ |

**वार्षिक क्रीडास्पर्धा आयोजनासाठी आर्थिक तरतूद :**

| | | |
|---|---|---|
| १. | परिमंडळ स्तरावर निवड चाचण्या आयोजित करण्यासाठी खेळांचे बाह्यगृह मैदान / आंतरगृह खेळासाठी सभागृह आरक्षित करणे, खेळांचे साहित्य खरेदी करणे तसेच खेळानुरुप खेळाडूंची निवड करण्यासाठी तज्ञ व्यक्तींची नेमणूक करणे इ. | - रु. १,००,०००/- |
| २. | राज्यस्तरीय आंतर परिमंडलीय क्रीडास्पर्धा आयोजित करणे. | - रु. ७,५०,०००/- |

उपरोक्त तरतूद **आर्थिक वर्ष २०२०-२१** पर्यत लागु राहील.

सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, सन २०१८-१९ च्या वार्षिक क्रीडा व नाट्यस्पर्धेचे आयोजन वर दिलेल्या वेळापत्रकानुसार करण्यात यावे. वार्षिक क्रीडा व नाट्यस्पर्धा आयोजनानंतर सदर स्पर्धेचा सविस्तर अहवाल १५ दिवसांच्या आत सांघिक कार्यालयास सादर करावा. तसेच, सदर परिपत्रकास व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

सदरचे परिपत्रक महावितरण कंपनीच्या RAPDRP -Infoportal मध्ये Circular (I.R. Department) येथे उपलब्ध असून त्यांची मुद्रांकित प्रत प्रसारीत करण्यात येणार नाही.

सोबत : परिशिष्ट 'अ'

**(चंद्रशेखर येरमे)**
**कार्यकारी संचालक (मासं)**

**प्रत :**
प्रेषण यादी प्रमाणे कार्यकारी अभियंता व तत्सम स्तरापर्यंत.

## परिशिष्ट 'अ' (सन २०१८-१९ करीता)

### भाग - १ आवेदन पत्र

| | | |
|---|---|---|
| १. कर्मचाऱ्याचे नाव | : | |
| २. भ.नि.नि. क्र. | : | |
| ३. पदनाम | : | |
| ४. वय | : | |
| ५. भ्रमणध्वनी क्र. | : | |
| ६. विभागाचे नाव | : | |
| ७. मंडलाचे नाव | : | |
| ८. खेळ / क्रीडा प्रकार | : | १. |
| | | २. |
| | | ३. |
| ९. सन २०१७-१८ च्या आंतर परिमंडलीय क्रीडास्पर्धेत सहभाग / प्राविण्याचा तपशील | : | |
| १०. सन २०१७-१८ च्या आखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाच्या क्रीडास्पर्धेत सहभाग / प्राविण्याचा तपशील. | : | |
| ११. नवीन भरती झालेल्या कर्मचाऱ्याचा शालेय / जिल्हा / राज्य / राष्ट्रीय पातळीवरील क्रीडास्पर्धेतील सहभाग / प्राविण्याचा तपशील | : | |

### भाग - २ हमी पत्र

सदरहू स्पर्धा कर्मचाऱ्यांच्या अंगी असलेल्या क्रीडा गुणांना वाव मिळण्यासाठी तसेच कर्मचाऱ्यांच्या अंगी नवचैतन्य व स्फुर्ती निर्माण होण्यासाठी आयोजित करण्यात येत असल्यामुळे सदर स्पर्धेत सहभागी होतांना माझ्याकडून कंपनीची मानहानी / शिस्तभंग होणार नाही तसेच, कंपनीच्या सन २०१८-१९ च्या वार्षिक क्रीडास्पर्धेत सहभागी होण्यासाठी मी पुर्णपणे शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त असल्याची हमी देत आहे.

कर्मचाऱ्याची सही

दिनांक :

नियंत्रण अधिकाऱ्याची सही व शिक्का